## एडिटोरिअल: प्रगतीचा मुहूर्त

एका शेतकरी वडीलांनी त्याच्या थोड्याश्या आळशी असणाऱ्या मुलाला शेताच्या बांधावरती फळझाडे लावायला सांगितली. नेहमीप्रमाणे मुलाने वडिलांना सांगितले  कि 'मी असे करतो फळझाडे लावायचा चांगला मूहूर्त शोधतो आणि मग ती लावतो.' तेव्हा वडिलांनी गावातील देवळात आलेल्या साधूकडे मुलाला पाठवले. साधूने सगळी घटना ऐकली. आणि साधू मुलाला म्हणाला 'तुला मी फळझाडे लावायचे दोन मूहूर्त देतो'. हे ऐकून मुलगा खुश झाला. कारण दोन मूहुर्तांपैकी उशिरा असलेला मुहूर्त त्याला निवडता येणार होता आणि तो पर्यंत तो निवांत राहू शकणार होता. साधू पुढे म्हणाला 'बांधावरती झाडे लावायच्या दोन मुहूर्तांपैकी एक नंबरचा मुहूर्त मी तुला नंतर सांगतो आधी दोन नंबरचा मुहूर्त ऐक' मुलगा उत्सुकतेने ऐकू लागला. 'फळझाडे लावायचा दोन नंबरचा मूहूर्त १० वर्षा पूर्वी होता.' मुलगा अवाक होऊन साधूकडे बघायला लागला. साधू म्हणाला 'जर १० वर्षा पूर्वी तु झाडे लावली असतीस तर आज तुला त्याची फळे मिळाली असती.'  मुलाला काही कळेना. संभ्रमीत अवस्थेत मुलाने साधूला विचारले 'मग झाडे लावायचा सगळ्यात चांगला मूहूर्त, जो पहिला मूहूर्त आहे तो कुठला?' तर साधू पटकन उत्तराला 'आत्ता! ह्या क्षणी!! बांधावर झाडे लावण्याचे  काम सुरु करण्याचा सगळ्यात चांगला मूहूर्त आत्ता आहे! ह्या क्षणी!! जा आणि कामाला सुरवात कर.'

हि गोष्ट मला एव्हढ्यावरुन आठवली की भारतामध्ये GST चालू झाल्यानंतरचे सर्वात जास्त GST कलेक्शन आत्ता गेलेल्या एप्रिल महिन्यामध्ये झाले. मागच्या एप्रिलच्या साधारण १२% जास्त GST कलेक्शन यंदाच्या एप्रिलमध्ये झाले. भारतातील इकॉनॉमी झपाट्याने वाढत आहे, व्यवसाय वाढत आहेत याचेच हे लक्षण आहे. व्यवसाय वाढण्याची वेगवेगळी कारणे आहेत. एक म्हणजे चांगले एन्व्हायरमेंट आहे. भारतामध्ये आज शहरीकरण वाढत आहे. लोकांना नवनव्या रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होत आहेत. लोक पैसे खर्च करत आहेत. त्यामूळे निरनिराळ्या व्यवसायांची वाढ होत आहे. ह्याच बरोबर भारताची लोकसंख्या ही देखील सध्या सर्वात जास्त आहे. आणि वाढलेल्या ह्या लोकसंख्येची लाईफस्टाईल सुद्धा बदललेली आहे.

जीवनशैली कशी बदललेली आहे ते बघा. माझ्या एका मित्राचा छोट्या गावामध्ये दुसऱ्या मजल्यावरती फ्लॅट आहे. तो फ्लॅट विकत घेण्यासाठी ५-६ गिऱ्हाईक सुद्धा येऊन गेली. प्रत्येक गिऱ्हाईकाने फ्लॅट बघितल्यावर मित्राला 'फ्लॅट चांगला आहे' असेच सांगितले. परंतु त्यापैकी कोणी एकानेही मित्राला परत कॉन्टॅक्ट केला नाही. मित्राने दोघा-तिघांकडे चौकशी केल्यावर त्यांनी सांगितले कि 'आम्हाला लिफ्ट असलेला, ॲटॅच संडास-बाथरुम असलेला फ्लॅट हवा आहे.' म्हणजेच काय तर एका मध्यमवर्गीय कुटुंबाच्या बदललेल्या लाईफस्टाईलमुळे त्यांच्या गरजा बदलत आहेत. त्यांच्या आवश्यकता बदलत आहेत. आणि म्हणूनच, लोकांना लागणाऱ्या अशा नवीन नवीन गोष्टींमुळे इन्फ्रास्ट्रक्चरमध्ये देखील झपाट्याने बदल होतो आहे. एकंदरीतच काय तर लोकांना नवीन गोष्टी विकत घ्यायच्या आहेत आणि त्या मधूनच व्यवसायवृद्धी होणार आहे. आणखी एक महत्वाचा फॅक्टर म्हणजे बदललेल्या लाईफस्टाईल सोबत लोकांची (कस्टमर) खर्च करण्याची क्षमता (स्पेंडिंग कॅपॅसिटी) देखील वाढलेली आहे. आणि ह्या सगळ्याचा एकत्रित परिणाम म्हणून व्यवसायासाठीचे, वाढीचे, प्रगतीचे अनुकुल वातावरण (मार्केट) भारतामध्ये निर्माण होत आहे.

हि व्यवसायवृद्धीची संधी प्रत्यक्षात उतरवण्यासाठी आवश्यक असणारी सगळ्यात मोठी गोष्ट असते ती म्हणजे 'कामाला चांगली माणसे मिळणे!' आज भारतामध्ये सरासरी वय २८ वर्षे आहे. आत्ता ग्रॅज्युएट होणाऱ्या पिढीचे म्हणजे मिलेनिअर्स अर्थात २००० सालानंतर जन्मलेलया पिढीचे पॉप्युलेशन भारतामध्ये खूप जास्त आहे. आणि त्यामुळेच जगाच्या इतिहासात पहिल्यांदाच नोकरीसाठी उपलब्ध असणाऱ्या तरुणांची संख्या २०२० ते २०२५ या पाच वर्षांच्या कालावधीत सर्वात जास्त भारतामध्ये असणार आहे. मग एवढ्या लोकांना जर नोकरीची संधी हवी असेल तर कामासाठी चांगली मॅनपॉवर मिळणे सहज शक्य आहे. म्हणजेच अगदी छोट्यात छोट्या व्यावसायिकाला सुद्धा उत्तम मॅनपॉवर मिळू शकते. कारण मार्केटमध्ये अव्हेलीबिलिटीच खूप आहे. आणि मग अशा उत्साही यंग जनरेशनला जर संस्था पातळीवर चांगले व्यावसायिक ट्रेनिंग दिले गेले, त्यांना चांगले शिकवले गेले तर व्यवसायांसाठी सर्वोत्तम काम करणाऱ्यांची फळी नक्कीच तयार होऊ शकते. यात एक

छोटासा मजेशीर भाग म्हणजे ज्वेलरी व्यवसायच्या दृष्टीने ही सगळी तरुण मंडळी लग्नपण करणार आहेत. आणि ज्वेलरी व्यवसायासाठी 'लग्न' हा तर मोठा व्यवसाय करण्याचा, व्यवसायवृद्धीसाठीचा सर्वात मोठा मार्ग असतो. त्यामुळे सहाजिकच या भविष्यातील लग्नसराईमुळे ज्वेलरी व्यवसायाला आपसूकच मोठे मार्केट उपलब्ध असणार आहे. आणि ज्वेलरी व्यवसायाची मोठ्या प्रमाणात वाढ होणार आहे.

व्यवसाय वृद्धीसाठी आणखी एक सगळ्यात महत्वाचा घटक म्हणजे परिणामकारक कार्यवहनासाठी (इफेक्टिव एक्झिक्युशन) चांगली टूल्स वापरणे. इफेक्टिव एक्झिक्युशनसाठी आत्ताच्या युगात सर्वात चांगले टूल म्हणजे डिजिटल टेक्नॉलॉजी. माझा एक सहकारी आहे. त्याचे इंग्लिश फारसे चांगले नाही. मध्यंतरी त्याने मला मेल केली आणि त्यातले इंग्लिश बघून मी थक्क झालो. मी त्याला विचारले की 'हे डॉक्युमेंट तू कसे तयार केलेस?' तर तो म्हंटला 'मी CHAT GPT वापरले'. म्हणजे 'डिजिटल टेक्नॉलॉजी' मुळे ज्याचे इंग्लिश चांगले नाही आता तो ही इंग्लिश डॉक्युमेंट तयार करु शकतो. व्हॉट्सअ‍ॅप किंवा मोबाईलच्या माध्यमातून वेगाने कम्युनिकेशन करु शकतो. व्यवसायामध्ये सुद्धा बिलिंग, अकॉउंटिंगसाठीची टेक्नॉलॉजी वापरुन कामाचा वेग आणि अचूकता वाढवू शकतो. आणि म्हणूनच टेक्नॉलॉजी हा इफेक्टिव एक्झिक्युशनसाठी सर्वात महत्वाचा घटक आहे.

अनुकुल वातावरण, चांगलया मॅनपॉवरची मुबलक उपलब्धता, आणि हातात असणारी टेक्नॉलॉजी टूल्स यासोबत आपण सारेच मोठ्या व्यवसायवृद्धीसाठी कटिबद्ध राहूयात. प्रगती सुरु करण्याचा मुहूर्त आत्ताच तो काय असतो! लांबणीवर नसतो!!